ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# नवपिढी व जुनीपिढी मधील संघर्ष : एक सामाजिक अध्ययन

**प्रा.डॉ.राजेंद्र यादवराव बारसागडे**
समाजषास्त्र विभाग प्रमुख
एफ. ई. एस. गर्ल्स कॉलेज,चंद्रपूर

★★★

**सारांश** – समाजात प्रामुख्याने आपणास अनेकपिढया दिसून येतात. परिवर्तण हा निसर्गाचा नियम आहे. प्राचिनकाळा पासुन अनेक पिढया एकत्र नांदताना दिसतात. पूर्वी नवीपिढी व जुनीपिढी याच्यात संर्धा नव्हता. एकत्र कुटूबपध्दती असल्यामुळे तिन ते चार पिढीचे लोक एकत्र नांदत होते. वध्द व्यक्ती कुटूंब प्रमुख व कर्ता व्यक्ती होता. त्याच्या मार्गदर्शनातच नवपिढी घडत होती.कुटूंबातील मोठया व्यक्तीचा तरूणपिढी अपमान करत नव्हती. तर त्याच्या आज्ञेनेचे पालन करीत होते. शिक्षण नोकरी,पाश्चिमात्य संस्कृती, व्यक्तीवाद, बदलते सामाजिक मूल्य यामुळे नव पिढीवर वेगळा प्रभाव पडू लागला. तरूण पिढी स्वताला हुशार आणि नवविचारची मानु लागली. नव पिढी भावनिक दुष्टिकोणातुन विचार करायला तयार नसते जून्या पिढीच्या लोकांना नविन पिढीचे लोक मागासलेली समजतात. नव पिढी व जुनी पिढी यांच्या विचारात एकवाक्यता नसते. प्रत्येक पिढीचे एक विशेषता असते.त्यानुसार पिढीतील लोक जीवन जगण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक पिढीतील लोकांना वाटत असते की आपण जे करतो ते बरोबर व चागंले आहे. प्रत्येक पिढीचे सामाजिक मूल्य व जीवन जगण्याची पध्दत वेगळी असते. कुटूंबात आई वडील व मुले, सासू आणि सून यांच्या विचार भावना यात भिन्नता असते. निर्णयाच्या बाबतीत एकवाक्यता नसते.दोन पिढीच्या लोकांमध्ये सवांदात दुरावा असल्याने नवपिढी व जुनीपिढी याच्यात वाद होत असतात. परंतु वाद केवळ नकारात्मकच होत असते असे नाही तर तो सकारात्मक सुध्दा असते.

**मुख्य शब्द** : नवपिढी, जूनीपिढी, जीवन जगण्याची पध्दत, सामाजिक मूल्य, वैचारिक मतभेद, सवांदाचा दुरावा

**प्रस्तावना** 21व्या शतकाचा विचार करता मानवाला समाजात अनेक सामाजिक प्रश्नांना तोडं देत जीवन जगावे लागत आहे. खरे तर नविन पिढी व जुनी पीढी या मधील वाद हा नविन नाही. प्रत्येक पीढीने याचा अनुभव घेतलेला आहे. नविनपिढी आणि जुनीपिढी यात वैचारिक मतभेद असने स्वभाविक आहे.कारण परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. या नियमानुसार व काळानुसार जीवनाचा दृष्टिकोन व जीवन मूल्यात बदल होत असतात. परंतु या बदलांना जुनी पिढी सहजपणे स्वीकारू शकत नाही परंतु नव्यापिढीला बदल हवा असतो. परिणामतः दोनपिढयांमध्ये वाद होत असते. हा वाद कुटूंबात आईवडील व मुलां मध्ये आज मोठया प्रमाणात होवू लागले आहेत. आजी आजोबा आणि नातंवड याच्यात संघर्षाची तिव्रता कमी आहे. तर काही नातवंडचा अपवाद सोडल्यास ते आजी आजोबाच्या विचारांचा आदर करतात. अशा परिस्थितीत मधली पिढी जास्त प्रभावित होत असते. नविन व जुन्यापिढी मध्ये वाद मात्र आज होत असतात.

आधुनिक समाजात कुठलीही सामाजिक समस्या असेल ती संवादानी दुर केली जावु शकते. निश्चित स्वरूपात समन्वय साधता येते. दोन पिढयांमधील वैचारिक मतभेद असतात. त्यावर जुन्या पीढीतील लोकांनी बदलते सामाजिक मुल्य समजुन घेतले पाहीजे. जागतिकीकरणाने जगकुप जवळ आले आहे व त्यात वेगाने बदलही होत आहे. हल्लीची पीढी सतत मोबाइल व इतर इलेक्ट्रॅानिक साधनांचा वापर करण्यात व्यस्त आहे. पूर्वी मनात कोणताही प्रष्न किवा षंका असली की एकमेकांना विचारून, त्यावर चर्चा करून, त्याचे निरसन करण्यात येत होते. कुटुंबातील सदस्यांषी सवांद साधून ते सोडविले जात होते. वर्तमानकाळात मनातील कोणताही प्रष्न, शंका असल्यास समाधान हातातील मोबाइल मध्ये उपलब्ध असते. त्यामुळे इतरांशी, प्रश्नांबाबत शंका, अडचणींबाबत घरातील सदस्यांमध्ये सवांद साधण्याचे प्रमाण कमी होत आहे. कौटुंबिक समस्येबाबत आजची नवपिढी दुर आहे. घरात काय चालेले आहे याचे त्यांना देणे घेने नसते. आजची नव पिढी मोबाईलवर अधिक व्यस्त आहे. मोबाईल मूळे तरूणाचे विश्वच आज बदलले आहे. कोराना महामारीच्या काळात अजुन त्याला अधिक खतपाणी घातले आहे. जसे मिटीगं क्लासेस सगळे ऑनलाईन असल्याने एकाच घरात राहुन सुध्दा एकमेकाषि संवाद साधला जात नाही. विचाराची देवाण घेवाण ही होत नाही. नवपीढीने गरजेपुर्ती या आधुनिक साधनांचा वापर केल्यास निश्चितच दोन्ही पिढयामध्ये सवांद वेळोवेळी साधता येइल.जुनीपीढी आणी नवीपीढी याच्यातील संघर्ष तर सुरूच राहणार कारण की दोन पिढयातील अंतर 20 ते 25 वर्ष किवा त्यापेक्षा जास्त असु शकेल तसेच तरूणपीढी आणि जुनीपीढी यांच्या विचारात तपावत असते. आपण किती सांगण्याचा प्रयत्न केला तरी वैचरिक मतभेद होणार कारण की काळानुसार सामाजिक मुल्य जीवनशैली बदलत असते नव विचार प्रवाह अस्तित्वात येते. नव विचार प्रवाहाला नवपीढी लवकर आत्मसात करीत असते. परतु जुनीपीढी ते लवकर आत्मसात करू शकत नाही. वास्तविक पाहता पुर्वी ग्रामिण व्यवसायाशी संबधीत संयुक्त कुटूंब पध्दती अस्तित्वात होती अषा संयुक्त कुटूंबपधदतील कर्त्या व्यक्तीस व कुटूंब प्रमुखास मानाचे स्थान होते सर्व सदस्य त्याच्या विचाराच्या बाहेर जात नव्हते. कुटूंब प्रमुखचे नियत्रंण सर्व सदस्यावर असायचे समजा ऐखादया प्रसंगी सदस्यांमध्ये वाद निर्माण झाल्यास तरी कुटूंब प्रमुख सदस्यातील मतभेद दुर करीत होते. त्यामुळे कुटूंबात नविनपीढी व जुनीपीढी अतंर्गत वादाचे प्रमाण

फार कमी होते.आजच्या काळाचा विचार करता आज सामाजिक मुल्य बदलली आहे, शिक्षणाचा प्रसार, व्यक्तीवादी विचारसरणी, विभक्त कुटूंब, नोकरी, व्यवसाय शहरीकरण पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव यासारख्या घटकामुळे आज जुनीपिढी व नविन पिढीमध्ये वाद होताना दिसुन येते. कुटूंबसंस्था समाजरूपी मानवी जीवनाच्या इमारतीचा पाया व प्रथम बालवाडी मानली जाते. कुटुंबसस्थेत दोन पिढयान मध्ये संर्घश होताना दिसुन येते.

**सामाजिक सशोधनाचा उध्देश** : 1 नवपिढी व जुन्यापिढीत संघर्षाच्या कारणाचा शोध घेणे, 2.नवनि पिढी व जूनीपिढीतील संघर्षाच्या परिणामाचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविणे.

**गृहितकृत्य** : बदलत्या सामाजिक मूल्यांमूळे दोनपीढीत संधर्ष उद्‌भवतो. नवपिढी व जुनीपिढी यांच्या संधर्षाचा परिणाम कुटूंबावर पडतो.

**तथ्य संकलंन पध्दती** :: संदर्भ पुस्तके, वर्तमानपत्रे, सोशलमिडीया या दुय्यम स्त्रोतांच्या माध्यमातून माहिती संकलन करणे.

**नवपिढी व जुन्यापिढीचा अर्थ** : नविन पिढी म्हणजे जे आजच्या आधुनिक विचारसरणीला मानतात व त्यानुसार जीवन जगतात म्हणजेच एक प्रकारे आजची युवापीढी म्हणजे नविन पिढी होय तर जुनी पिढी म्हणजे जे लोक आधुनिक विचार धारेला विरोध करतात समाजाच्या जुन्या मुल्यांनुसार वागतात समाजाच्या प्रथा– पंरपरा याला अधिक महत्व देतात व जुन्या मुल्यांना चिकटून असतात. त्या लोकांचा अथवा व्यक्तीचा समावेश जुन्या पिढी अंतर्गत केला जातो ज्यात प्रामुख्याने वडीलधारी माणसे म्हणजेच एक प्रकारे आई,वडील आजी, आजोबा याचां समावेष जुन्या पिढी अंतर्गत केला जातो.

**नवपिढी व जुनीपिढी सघंर्षाची कारणे –**

1. जुन्यापिढीतील व्यक्ती नवपिढीवर सत्ता गाजवितात व अन्यायपूर्ण व्यवहार करतात. नव पिढीला हे नको असते. यातूनच नवपिढी व जुनीपिढी यात वाद होत असतो.
2. नवपिढीतील युवकांना वाटत असते की आम्ही आमच्या पालकांपेक्षा प्रगतीशील व सुंस्कृत आहोत या विचारातुन नवपिढी व जुन्यापीढीत वाद होतो.
3. नवपिढीच्या युवकांना वाटत असते की आमच्या स्वतंत्र्य व विकासा मध्ये जुन्यापिढील सदस्यांची विचारधारा बाधक ठरत असते हे नवपिढीच्या लोकांना नको आहे यातुनच एक प्रकारे दोन पिढयातील लोकांमध्ये सघर्श उदभवत असतो.
4. बरेचदा जुन्यापिढीतील लोक म्हणजे पालक नवपिढीच्या आवश्यक गरजा पूर्ण करीत नाही यातूनच मुलांचे वडीलांषी वाद होत असतात.
6. जुन्यापिढीतील लोकांना नवपिढीतील तरूणाची मुक्त जीवनशैली आवडत नाहीकृतर नवपिढीला आईवडीलांचे जुन्यापंरपरा व रूढी चिकटून असणे पटत नाही.यातून दोन पिढीत वाद होत असतो.
7. आजच्या शिक्षणप्रणालीत मुल्यांचा अभाव जाणवतो व व्यक्तीने कसे वागावे, एकमेकांशी व संबंध कसे ठेवावे, वृध्द आजी आजोबा बाबत आपले कर्तव्य काय, याबाबत तरूण पिढी विसरत चाललेली आहे व यातूनच एक प्रकारे नवपिढी व जुनीपिढी या मध्ये दरी निर्माण होत आहे.
8. नवपिढी व जुन्यापिढीत सामाजिकतेचा अभाव निर्माण होत आहे व सोबतच सदस्यांमध्ये मानवी संवेदनशिलता या व्यक्तीभिमुख होत आहे. त्यामुळे दोन पिढीत दुरावा निर्माण होत आहे.
9. व्यक्तीची आजची जीवनशैली ही यांत्रिक बनलेली आहे. व्यक्ती दिवसभर कामात व्यस्त असतो. त्या व्यक्ती कडुंन जीवन मुल्य जोपासणे, वडील व्यक्तीचा आदर, सेवेची अपेक्षा करणे निरर्थक आहे. परंतु घरातील वडीलधारी व्यक्तीना कमवित्या व्यक्ती कडुन अनेक अपेक्षा असतात त्या अपेक्षा पूर्ण न झाल्यामुळे वाद निर्माण होतात.
10. नव्यापिढीचे स्वैरपणे वागणे, मुला मुलीचे एकत्र फिरणे, फैशन करणे,रात्री उशिरा घरी परत येणे, मुलींचे तोकडे कपडे घालणे जुन्यापिढीतील लोकाना आवढत नाही. यातुनच एकप्रकारे जुनीपिढी आणि नवपिढीतील लोकांना मध्ये वाद निर्माण होतात.

**नवपिढी व जुनीपिढीवादाचे परिणाम** : दोनपिढीतील विचारां मध्ये व मुल्यांमध्ये भिन्नता असल्याने नवपिढी व जुनीपिढी याच्यात एकमेकांबाबत वैचारिक, कलहामुळे व्यक्तींमध्ये निराशा निर्माण होते. दोन्ही पिढीतील लोकांची मानसिकता बिघडते, याचा परिणाम कुटूंबावर पडत असते. कुटूंबात नेहमी एकमेकांनबाबत राग असतो. त्यातुन चिडचिडपणा निर्माण होते. एकाच घरातील सदस्यां मध्ये एकमेकांविषयी कटुता निर्माण होते. व यातुन मानसिक संतुलन ढासळते मनात अनेक विचार येतात काही व्यक्ती टोकाची भूमिका घेऊन स्वतःला संपवितात. दोन पिढीतील संघर्षामुळे व्यक्तीमध्ये निराशा निर्माण होते व कुटंबाचे विघटन होते.

**नवपिढी व जूनीपिढी संघर्षावर उपाय –**

1. जुन्यापिढीने नवपिढीला चांगले काय वाईट काय याची जाणीव करून देणे. जुनीपिढी व नवपीपिढीने आपले कर्तव्य व जबाबदारी योग्य रीतीने पार पाडून दोन्ही पिढीत समनवय साधने आवश्यक आहे.

2. प्रत्येकाचे स्वतःचे कुटूंबाशी आणि समाजाशी नाते असते व ते नाते जपण्यासाठी सामाजिक मूल्य कायम ठेवुन काळानुरूप प्रत्येक गटातील व्यक्तीने नविन मार्गाचा स्विकार केला पाहीजे

3. जुन्यापिढीतील व्यक्तीने आपला इगो, मी पणाची भावना बाजुला ठेवाव्या 4. नव विचारप्रवाह मध्ये वावरताना जेष्टानी नवा दृष्टिकोण निर्माण केला पाहिजे व घरातील सदस्याशी जुळवुन घेतले पाहीजे

5. प्रत्येकाला आनंदान रहावे असे वाटत असेल तर आपल्या भूमेकेची अदला बदल करून पाहावी तेव्हा आपणस सर्व नव दिसेल व आपणास आनंदात राहता येइल 6. आपल्या बोलण्याच्या वागण्यातुन एकमेकांबाबत आदर, प्रेम, काळजी व्यक्त केली पाहीजे. त्यामुळे आपल्या मुलांच्या मनातही त्या प्रवृत्ती रूजतील आणि कुटूंबा मध्ये व आपल्या घरामध्ये एक प्रकारे आनंदमय वातावरण निर्माण होइल.

7. नवपिढी व जुनीपिढी काळानुसार बदलत असते व जुने व नविनवाद हा चालु असते त्यामुळे दोन्हीपीढीतील घ्येय धोरण परस्परातील सामंजस्य निर्माण करून सवांदातुन आणि समन्वयातुन वाद सोडवता येतात. 8. काळानुसार एका पिढीची जागा पुढची पिढी घेते त्यामुळे जुन्यापिढीतील लोकांनी नविन पिढी चा द्वेश न करता काळानुसार स्वतः मध्ये बदल केल्यास दोन पिढीत वाद होणार नाही

9. जुन्यापिढीतील लोकानी नवपिढीतील लोकाना जुन्या मुल्याचे महत्व पटवून देणे आजच्या परिस्थितीत त्यां उपयुक्तता समजवुन सांगणे आवश्यक आहे. कारण काळ कीतीही बदलला तरी वडीलधाऱ्यांचा आदर करणे त्याची सेवा करणे, खोटे न बोलणे, प्रामाणिकपणे वागणे ही मुल्य कधीच कालबाहय होत नसतात

10. आधुनिक तत्रंज्ञान व त्यावर आधारित नवविचार व नविनमूल्ये बदलत्या काळानुसार कशी महत्वाची आहेत हे जुन्यापिढीतील लोकाना पटवून देणे हे नव्यापिढीची जबाबदारी आहे

11. जुन्यापिढीतील लोकानी आपल्या जीवनशैलीत बदल करून नवपिढीतील आधुनिक व वैज्ञानिक विचार स्विकारणयाचा प्रयत्न केले असता दोन पिढीत संघर्ष होणार नाही.

12. नवपिढीने वृध्दांचा मान करणे त्यांच्या विचार, भावना समजून घेतल्यास दोनपिढीत वाद होणार नाही.

13. जुन्यापिढीतील लोकांनी नवपिढीला पंरपरागत, सामाजिक व धार्मिक विचाराचे महत्व पटवून देणे पंरतु बधंने मात्र नवपिढीवर लादू नये

**निष्कर्श** – नवपिढी व जुनीपिढी एकाच नाण्याच्या दोन बाजु आहे कृनवपिढी ही आधुनिक विचारांना महत्व देते तर जुनीपिढी ही पारंपारीक विचार व मुल्यांना महत्व देते. 1960 मध्ये जनरेषेन गॅप या सिध्दांताची निर्मिती झाली. यानुसार.दोन्ही पिढीतील अंतंर हे 20ते 25 वर्षापेक्षा अधिक असते कृदोन्ही पिढीत खानपान, विचार ,आवड निवड ,सामाजिक विष्वास, सामाजिक मुल्य, या याबाबत बरीच भिन्नता असते. आधुनिक जीवनशैली, सामाजिक माध्यमे, नविन सभ्यता, व्यक्तीगत स्वातंत्र्य नवपिढीतील मुलांना हवे असते. परंतु जुन्यापिढीतील लोकांना या बाबी नको असतात. नवपिढी व जुनीपिढी यात संघर्ष होते जेव्हा वाद टोकाला जाते व्यक्तीच्या मनात एकमेकांबाबत कटुता, मत्सर भावना निर्माण होते. नवपिढीतील युवक जुन्यापिढीच्या लोकांचे बोलणे मनावर घेत असतात व काही शेवटी स्वातःलाही सपंवतात. दोन्ही पिढीतील लोकांनी सामाजिक सबंध सलोख्याचे ठेवण्यासाठी दोन्ही पिढीतील सदस्यानी एकमेकास समजुन घेतले पाहिजे. दोन्ही पिढीतील लोकानी वैचारिक भिन्नतेचा आदर राखला पाहिजे व एकमेकांच्या भावना विचारसरणी सामाजिक मुल्य समजून जीवन जगले पाहिजे तेव्हाच दोन्ही पिढीत एक प्रकारे समन्वय साधता येईल

**सदंर्भ :**


1. *भारतीय समाज संरचनात्मक प्रष्न आणि सामाजिक समस्या लेखक डॉ.आगलावे प्रदिप डॉ. आगलावे सरोज श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर जुलै2018*
2. *.www.hindikiduniya.com>essy*
3. *From m.Jagran.com. delivered by google*
4. *https://m-patrika.com.cdn cdn.ampproject.org*